आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१५ फेब्रुवारी २०२५ शनिवार

**ठळक बातम्या**

- विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं सरन्यायाधीशांचं प्रतिपादन

- छत्तीसगढमधे सर्व १० महानगरपालिकांमधे महापौर पदी भाजपाचे उमेदवार विजयी

- हमासकडून आज गाझा मधून तीन इस्रायली नागरिकांची सुटका

- अग्रमानांकित टेनिसपटू जेन्निक सिन्नरवर उत्तेजक द्रव्य सेवन प्रकरणी तीन महिन्यांची बंदी

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट संघ आज दुबईला रवाना

**<><><><><>**

विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची अक्षर ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणं आवश्यक असतं, असं प्रतिपादन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज केलं. नागपूरजवळ वारंगा इथं महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ-नागपूर, चा तिसरा दीक्षांत समारंभ आज झाला, त्यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. या पदवीदान समारंभात, एकूण १५५ पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यात ११२ जणांना पदवी, २८ जणांना पदव्युत्तर पदवी तर १५ जणांना डॉक्टरेट पदवी देण्यात आली.

**<><><><><>**

छत्तीसगढमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी झालेल्या निवडणूकीत भाजपानं तिथल्या दहाही महानगरपालिकेच्या महापौरपदावर विजय मिळवला आहे. छत्तीसगढमधल्या १० महानगरपालिका, ४९ नगरपरिषदा, ११४ नगरपंचायती आणि १७३ नगरपालिकांसाठी ११ फेब्रुवारीला मतदान झालं होतं. त्याचे निकाल आज जाहीर झाले. महापालिकेच्या बहुतांश प्रभागांमध्येही भाजपाच्या उमेदवारांनी विजय मिळवला आहे किंवा आघाडी घेतली आहे. भाजपानं ३५ नगरपरिषदा आणि ८१ नगरपंचायतींच्या सभापतीपदाची निवडणूकही जिंकली आहे.

या निवडणुकीत काँग्रेसनं आठ नगरपरिषदा आणि २२ नगरपंचायतींच्या सभापतीपदावर विजय मिळवला, आम आदमी पार्टीनं एका नगरपरिषदेत आणि बहुजन समाज पक्षानं एका नगरपंचायतीच्या सभापतीपदाची निवडणूक जिंकली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या भारत टेक्स २०२५ या वस्त्रोद्योग मेळाव्याला संबोधित करणार आहेत. नवी दिल्लीत आय़ोजित या मेळाव्याचा समारोप उद्या होणार असून त्यात १२० देशातून आलेले प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

<><><><><>

उद्योग आणि देशांतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने आज गुजरात आणि राजस्थानमधल्या १४ पायाभूत सुविधा प्रकल्पांशी संबंधीत आढावा बैठक घेतली. या बैठकीत या प्रकल्पांना अडथळे ठरत असलेल्या सुमारे २१ समस्यांचा आढावा घेतला घेतला गेला. उद्योग आणि देशांतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे सचिव अमरदीप भाटिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला केंद्रीय मंत्रालये, राज्य सरकारांचे वरिष्ठ अधिकारी आणि प्रकल्प प्रस्तावक उपस्थित होते. या सर्व प्रकल्पांपैकी गुजरातमधील खावडा नवीकरणीय ऊर्जा संकूल प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ८१ अब्ज युनिट स्वच्छ उर्जेची निर्मिती होईल अशी माहिती अमरदीप भाटिया यांनी दिली.

<><><><><>

गोर-बंजारा समाजाचं आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांना अभिवादन केलं. श्री सेवालाल महाराज यांचे विचार न्यायप्रिय, सौहार्दपूर्ण आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून समाजाला सदैव मार्गदर्शन करत राहतील, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

श्री सेवालाल महाराज यांची जयंती आज महाराष्ट्रात **वाशिममध्ये** मानोरा इथं पोहरादेवी या सेवालाल महाराज यांच्या समाधीस्थळी उत्साहात साजरी करण्यात आली. इथं पालखी सोहळा, शोभा यात्रेसह अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं होत.

राज्यात इतर अनेक जिल्ह्यांत श्री सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

<><><><><>

तिसऱ्या काशी तामिळ संगमम् चं उद्धाटन आज वाराणसीत नमो घाट इथं करण्यात आलं. वैद्यक शास्त्राच्या सिद्ध चिकित्सेत अगस्त्य ऋषींचं योगदान तसंच तामिळ साहित्य आणि देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेतलं योगदान याबद्दल १० दिवस विशेष कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. तामिळनाडू आणि काशी यांच्या परस्पर प्राचीन संबंधांना उजाळा देण्याच्या हेतूनं हा कार्यक्रम आयेजित केला जातो.

<><><><><>

परीक्षेच्या ताणतणावाचं व्यवस्थापन करण्यात विद्यार्थ्यांना मदत करणारा परीक्षा पे चर्चा हा कार्यक्रम यंदा वेगळ्या स्वरुपात सादर होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मार्गदर्शन पहिल्या भागात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना लाभलं. त्यानंतर सहा भागात विविध क्षेत्रातले यशस्वी मान्यवर आपापले अनुभव सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. अध्यात्मिक क्षेत्रातले अग्रणी सद्गुरु यांनी आज विचार

मांडले. अभिनेत्री भूमी पेडणेकर आणि अभिनेता विक्रांत मेस्सी उद्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

<><><><>

हमास आणि इस्त्रायल यांच्यातल्या शस्त्रसंधी कराराअंतर्गत हमासनं आज गाझा मधून तीन इस्त्रायली नागरिकांची सुटका केली. हमासनं ७ ऑक्टोबर २०२४ ला केलेल्या हल्ल्यात किब्बुत्झ इथून या तिघांना ताब्यात घेतलं होतं. शस्त्रसंधी नंतरची ही कैद्यांची सहावी  देवाणघेवाण आहे.

हमासनं सुटका केलेल्या इस्त्रायली नागरिकांच्या बदल्यात, इस्त्रायल आपल्या ताब्यातल्या ३६९ पॅलेस्टिनी नागरिकांची सुटका करणार असल्याचं हमासच्या कैद्यांविषयक माध्यम कार्यालयानं म्हटलं आहे. यामध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेले ३६ आणि गाझामधल्या ३३३ जणांचा समावेश आहे. दरम्यान इस्त्रायलनं ओफर इथल्या तुरुंगातून या पॅलेस्टिनी नागरिकांना मुक्त करायला सुरुवात केली असल्याचं वृत्त तिथल्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे.

<><><><>

अमेरिकी लष्करानं पारलिंगी व्यक्तींची भरती बंद केली असल्याची घोषणा केली आहे. यापुढे लिंग बदलाच्या प्रक्रियेसाठी दिली जाणारी मदतही बंद करणार असल्याचंही अमेरिकेच्या लष्करानं समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २७ जानेवारीला यासंदर्भातला कार्यकारी आदेश जारी केला होता, आणि याबाबत पेंटागॉन अर्थान अमेरिकेच्या संरक्षण यंत्रणेनं ३० दिवसांमध्ये धोरण आखावं, असे निर्देश दिले होते.

<><><><>

लोकशाहीला पाश्चात्य देशांचं वैशिष्ट्य मानलं जात असल्याबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी  टीका केली आहे. ते काल म्युनिच सुरक्षा परिषदेत एका परिसंवादात बोलत होते. स्वतःच्या देशात लोकशाही तत्वांवर निष्ठा

ठेवताना ग्लोबल साऊथ मध्ये मात्र पाश्चिमात्य देश बिगर लोकशाही विचारांना समर्थन देत असल्याचा आरोप त्यांनी केला. भारत लोकशाही राबवण्यासाठी वचनबद्ध असून लोकशाहीच्या प्रारूपाशी एकनिष्ठ राहिल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला टेनिसपटू जेन्निक सिन्नर उत्तेजक द्रव्य सेवन चाचणीत दोषी आढळल्यानं, त्याच्यावर तीन महिन्यांची बंदी आली आहे. ९ फेब्रुवारी ते ४ मे या कालावधीसाठी ही बंदी लागू राहील. प्रशिक्षकांकडून उपचारांदरम्यान उत्तेजक पदार्थांचं सेवन केलं गेल्याचा दावा सिन्नर यानं केला होता. त्यानंतर आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रिटी एजन्सीनं त्याला निर्दोष मानलं होतं. मात्र जागतिक उत्तेजक विरोधी यंत्रणा अर्थात वाडानं त्याच्या विरोधात एका वर्षाच्या निलंबनासाठी अपील केलं होतं. अखेर वाडानं दिलेला तीन महिने निलंबनाचा प्रस्ताव सिन्नरनं स्वीकारला आहे.

**<><><><><>**

आयसीसीच्या एकदिवसीय क्रिकेट चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी रोहित शर्माच्या नेतृत्वातला भारतीय क्रिकेट संघ आज दुबईला रवाना झाला.
या स्पर्धेत भारताचा समावेश अ गटात असून, २० फेब्रुवारीला भारताचा सलामीचा सामना बांगलादेश विरोधात होणार आहे. त्यानंतर २३ फेब्रुवारीला पाकिस्तानविरुद्ध आणि २ मार्चला न्यूझीलंडविरोधात भारताची लढत होणार आहे.

स्पर्धेच्या विजेतेपदासाठी अंतिम लढत ९ मार्चला होणार आहे. भारतानं याआधी दोन वेळा या स्पर्धेचं विजेतपद आणि दोन वेळा उपविजेतेपद पटकावलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणी बँकेचा माजी महाव्यवस्थापक हितेश मेहता याला आज पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेनं ही कारवाई केली. हितेश मेहता यानं कोविड काळात बँकेच्या प्रभादेवी कार्यालयातून ११२ कोटी तर गोरेगावच्या कार्यालयातून १० कोटी असे एकूण १२२ कोटी रुपये इतरत्र वळवून, चोरी केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी दादर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता, नंतर तो आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला गेला होता.

<><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या पथकानं मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर तस्करीचं सुमारे सव्वा सात किलो सोनं काल रात्री जप्त केलं. या सोन्याची आंतरराष्ट्रीय बाजारातली किंमत सुमारे साडेसहा कोटी रुपये इतकी आहे. दुबईहून आलेल्या तीन प्रवाशांना याप्रकरणी अटक केली आहे.

<><><><>

महाराष्ट्रात तुळजापूर इथं अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या तीन जणांना पोलिसांनी अटक केली असून सुमारे १० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात सुमारे अडीच लाख रुपये किमतीचं मेफेड्रोन, तसंच वाहन आणि मोबाईल फोनचा समावेश आहे.

<><><><>

'केसरी टूर्स' च्या माध्यमातून पर्यटकांना जगभर पोहोचवणारे केसरी पाटील यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत.

मराठी माणसात पर्यटनाची रुची निर्माण करण्यापासून ते पर्यटन व्यवसायातल्या संधीची दिशा युवा उद्योजकांना दाखवण्यापर्यंत त्यांनी एक काळ गाजवला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी केसरी पाटील यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

सागर परिक्रमा २ मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात आय एन एस व्ही तारिणी नौकेमधून केप हॉर्न ओलांडत भारतीय नौदलाचे लेफ्टनंट कमांडर दिलना के आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केप हॉर्न हे दक्षिण अमेरिकेचं दक्षिणेकडचं टोक आहे. नौकापटूंना दक्षिणी सागराच्या या भागात नेहमी आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करावा लागतो. केप हॉर्न ओलांडण्याच्या या कामगिरीमुळे नौदलाच्या या दोन अधिकाऱ्यांना ‘केप हॉर्नर्स’ हा दर्यावर्दींसाठीचा बहुमान प्राप्त झाला आहे. केप हॉर्न हे ठिकाण अंटार्क्टिका पासून ४३२ सागरी मैल एवढ्या अंतरावर आहे.

**//<><><><><>//**